(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

६५२ एस सी आर [१९५३]

राम नारायण सिंग

विरुद्ध

दिल्ली सरकार आणि इतर.

१२ मार्च १९५३

[सरन्यायाधीश पतंजली शास्त्री, मुखर्जीया, एस. आर. दास, घुलाम हसन आणि भगवती न्या. न्या. ]

फौजदारी खटला - खटल्याची तहकुबी – आरोपीला कोठडी देण्याबाबत कोणताही आदेश नाही - स्थानबद्धतेची कायदेशीरता - फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ३४४ – बंदीप्रत्यक्षिकरण.

बंदीप्रत्यक्षीकरण कार्यवाहीमध्ये, न्यायालयाने परत येण्याच्या वेळी स्थानबद्धता कायदेशीर होती किंवा कसे या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे, खटला दाखल केल्याच्या संदर्भात नाही.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४४ मध्ये दंडाधिकाऱ्यासाठी आवश्यक आहे की, जर त्याने एखादा खटला तहकूब करण्याचा निर्णय घेतला, तर " कोठडीत असल्यास

आरोपीला वॉरंटद्वारे कोठडी " आणि पुढे अशी तरतूद आहे की, उच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयाने या कलमांतर्गत दिलेला प्रत्येक आदेश लेखी असेल. जेथे खटला चालवणाऱ्या दंडाधिकाऱ्याने लेखी आदेशाद्वारे खटला तहकूब केला परंतु तिथे त्याने आरोपीला कोठडीत पाठवण्याचा आदेश दिल्याचे दाखवण्यासाठी अभिलेखात काहीही नव्हते; तहकुबीच्या आदेशानंतर आरोपीला स्थानबद्ध करणे बेकायदेशीर आहे असे मानले जाते.

ज्यांना असे वाटते की इतर व्यक्तींचे वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे, त्यांनी कायद्याचे स्वरूप आणि नियम तंतोतंतपणे आणि अतिशय काटेकोरपणे पाळले पाहिजेत.

मूळ अधिकारता : याचिका क्र. ५४/१९५३. अनुच्छेद ३२ अंतर्गत बंदीप्रत्यक्षिकरणच्या स्वरूपातील याचिका.

जय गोपाल सेठी आणि वेद व्यास (त्यांच्यासोबत एस. के. कपूर, ए. के. दत्त, ए. एन. चोना, आर. पटनायक आणि ए. एन. सिन्हा) याचिकाकर्त्यांसाठी

सी. के. दफ्तरी, भारताचे महाधिवक्ता (त्यांच्यासोबत पोरस ए. मेहता) उत्तरवादींसाठी.

१२ मार्च १९५३. न्यायालयाचा सदर न्यायनिर्णय मुख्य न्यायाधीशांनी पारीत केला.

सरन्यायाधीश पतंजली शास्त्री – ही याचिका डॉ. एस. पी. मुखर्जी, श्री एन. सी. चॅटर्जी, पंडित नंदलाल शर्मा आणि पंडित गुरु दत्त वैद हे या प्रकरणातील खरे

याचिकाकर्ते आहेत या चार सज्जनांतर्फे राम नारायण सिंग यांनी दाखल केलेली बंदीप्रत्यक्षीकरण याचिका आहे. या लोकांना ६ मार्च १९५३ च्या संध्याकाळी अटक करण्यात आली होती आणि आता विवादित क्षेत्रात सभा आणि मिरवणुकांवर बंदी घालणाऱ्या अभिकथित आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल त्यांच्यावर खटला चालवला जात आहे, जो भारतीय दंड संहितेच्या १८८ कलमांतर्गत दंडनीय गुन्हा आहे.

त्यांच्या स्थानबद्धतेचे समर्थन दोन कोठडी (रिमांड) आदेशांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला जातो, एक दिल्लीच्या अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी श्री. ढिल्लों यांनी ६ मार्च रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पारित केला आहे, आणि दुसरा खटला चालवणाऱ्या दंडाधिकाऱ्यांनी ९ मार्च रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास या न्यायालयात बंदीप्रत्यक्षीकरण याचिका दाखल केली जात असल्याचे निवेदन त्यांच्या समोर केल्यानंतर खटला तहकूब करताना पारित केला आहे, असा दावा केला आहे.

आमच्यासमोर याचिकाकर्त्यातर्फे श्री. सेठी यांनी कायदा आणि वस्तुस्थितीच्या विविध प्रश्नांवर युक्तिवाद केला, परंतु त्या प्रश्नांवर चर्चा करणे अनावश्यक असल्याचे आम्ही मानतो, कारण आता हे मान्य केले गेले आहे की ६ मार्च रोजीचा कोठडीचा पहिला आदेश जरी तो वैध होता असे गृहीत धरले तरी तो ९ मार्च रोजी संपला आहे आणि तो आता अंमलात नाही. खटला चालवणाऱ्या दंडाधिकाऱ्यांनी ९ मार्च रोजी केलेल्या कोठडी आदेशाच्या दाव्या संदर्भात स्थिती खालीलप्रमाणे आहे :- खटला चालवणारा दंडाधिकारी स्पष्टपणे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४४ अंतर्गत त्या टप्प्यावर कार्यवाही करत होता, ज्यासाठी त्याला, जर त्याने त्याच्यापुढे प्रलंबित असलेला

खटला पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला तर, "कोठडीत असल्यास आरोपीला वॉरंटद्वारे कोठडी (रिमांड) देणे" आवश्यक आहे तसेच त्यात पुढील तरतुदी केलेल्या आहेत :- उच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयाने या कलमांतर्गत दिलेला प्रत्येक आदेश हा लेखी असेल व त्यावर पीठासीन न्यायाधीश किंवा दंडाधिकाऱ्यांची स्वाक्षरी असेल. १० मार्च रोजी केलेल्या या न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून या कलमांतर्गत दंडाधिकाऱ्यांचा आदेश आमच्यासमोर सादर करण्यात आला, ज्यामध्ये निर्देश दिले होते की, याचिकाकर्त्याच्या वकिलाद्वारे तपासणीसाठी रिमांड कागदपत्रांसह अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी आणि खटला चालवणाऱ्या दंडाधिकाऱ्यांसमोरील अभिलेख शक्य तितक्या लवकर या न्यायालयात सादर करावेत. सादर केलेल्या सदर आदेशात केवळ ११ मार्चपर्यंत प्रकरण तहकूब करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि त्या तारखेपर्यंत आरोपीला कोठडीत पाठवण्याचे कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत. काल संध्याकाळी ५ - २० वाजता या न्यायालयाच्या प्रबंधकांकडे कागदाच्या चार पर्च्या सुपूर्द करण्यात आल्या. एकीकडे ते ६ मार्च रोजीचे स्थानबद्धताचे वॉरंट असल्याचा दावा करतात आणि दिल्ली राज्याच्या तुरुंग अधीक्षकांना उद्देशून, आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आणि ९ मार्च १९५३ रोजी न्यायालयात हजर करण्याचे निर्देश देतात. या वॉरंटच्या पाठीमागे खालीलप्रमाणे शेरा होता :- "११ मार्च १९५३ पर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.”

बंदीप्रत्यक्षिकरणाच्या प्रश्नात, जेव्हा संबंधित व्यक्तींची कोठडी कायदेशीर आहे किंवा कसे यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, तेंव्हा हे उघड आहे की हे दस्तऐवज जर

खरे असतील तर ते अत्यंत महत्त्वाचे असतील, परंतु आमच्या १० मार्चच्या आदेशात स्पष्ट निर्देश असूनही ते सादर केले गेले नाहीत. आमच्यासमोर सादर केलेल्या न्यायालयीन अभिलेखामध्ये ९ मार्च रोजी केलेला कोठडीचा कोणताही आदेश नाही. आम्ही आधीच निरीक्षण केल्याप्रमाणे, आमच्याकडे खटला चालवणाऱ्या दंडाधिकाऱ्यांचा केवळ ११ तारखेपर्यंत प्रकरण तहकूब करण्याचा आदेश आहे. सरकारच्या तर्फे महान्यायअभिकर्ता यांनी स्पष्ट केले की या प्रकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कागदाच्या पर्च्या एका पोलिस अधिकाऱ्याकडे होत्या, जो काल न्यायालयात उपस्थित होता, परंतु संध्याकाळी न्यायालय उठल्यानंतर त्याला वाटले की त्यांचे सादरीकरण काहीसे महत्त्वाचे असू शकते आणि म्हणून ते प्रबंधकांसमोर संध्याकाळी ५ - २० वाजता दाखल करण्यात आले. अशा परिस्थितीत सादर केलेल्या कागदपत्रांची आम्ही दखल घेऊ शकत नाही आणि आरोपीला ११ मार्चपर्यंत पुढील कोठडी देण्याचा कोठडीचा आदेश देण्यात आल्याबद्दल आम्ही समाधानी नाही. या न्यायालयाने असे म्हटले आहे की, बंदीप्रत्यक्षीकरण कार्यवाहीमध्ये, न्यायालयाने परत येण्याच्या वेळी स्थानबद्धता कायदेशीर होती किंवा कसे या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे, खटला दाखल केल्याच्या संदर्भात नाही. या प्रकरणाच्या तथ्यांप्रमाणे १० मार्च ही मुख्य तारीख आहे, जेव्हा सरकारतर्फे स्थानबद्धता कायदेशीर असल्याचे समर्थन करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. पण आम्ही स्पष्ट केल्याप्रमाणे स्थिती अशी आहे की त्या दिवशी चार जणांना कोठडीत पाठवण्याचा कोणताही आदेश देण्यात आला नव्हता. या न्यायालयाने यापूर्वी अनेकदा पुनरुच्चार केला आहे की, ज्यांना असे वाटते की इतर व्यक्तींचे वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे,

त्यांनी कायद्याचे स्वरूप आणि नियम तंतोतंतपणे आणि अतिशय काटेकोरपणे पाळले पाहिजेत. या प्रकरणात तसे करण्यात आलेले नाही. त्यामुळे आता आमच्यासमोर असलेले याचिकाकर्ते हे त्यांची मुक्तता होण्यासाठी हक्कदार आहेत आणि त्यांना त्वरित मुक्त केले जाते.

याचिका मंजूर केली.

याचिकाकर्त्याचा अभिकर्ता : गणपत राय.

उत्तरवादींसाठी प्रतिनिधी : जी. एच. राजाध्यक्ष.

------------

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-----------